मराठवाडा

# पोलीस टाइम्स





## दिवाळी विशेषांक-2011

स्वागत मूल्य-51













Savera Offset, A.bad 9823034008

# 'भाऊ' ऊर्फ भवरलाल जैन सृजनशील आणि उद्योगशील व्यक्तीमत्व



**श्री. भवरलाल हिरालाल जैन** जळगावचे सुविख्यात उद्योगपती, साधारण वय ७१ वर्षांचे. जळगाव-औरंगाबाद रस्त्यावर असणाऱ्या वाकोद या लहानशा खेड्यात एका मारवाडी कुटुंबात जन्मलेल्या या माणसाने स्वकर्तृत्वावर विशाल औद्योगिक साम्राज्य निर्माण केलेय. आज त्यांचे नाव संपूर्ण देशभरच काय, पण जगभर घेतले जाते ते आदराने.

परिस्थितीशी झगडत जेव्हा एखादी व्यक्ती स्वकर्तृत्वावर यशाचा ध्वज जगभर फडकवते तेव्हा सामान्यजनांमध्ये तिच्याविषयी निश्चितच उत्सुकता निर्माण होते. त्या व्यक्तीच्या यशाचं चारही बाजूंनी विश्लेषणात्मक मोजमाप होते. ते यश कशाने लाभले, ते गुपित शोधायचा प्रयत्न होत राहतो. कारण समाजात अशा तळावरच्या स्तरांत धडपडणाऱ्यांची संख्या खूप मोठी असते. म्हणूनच सर्वांना अशा प्रकारचा देदीप्यमान यशाचा रेडिमेड फॉर्म्युला हवा असतो. तो मिळाला तर त्याची हुबेहूब नक्कल-कॉपी करून तेच-तसंच यश मिळविण्याचा त्यांचा बेत असतो. त्या कर्तृत्वसंपन्न व्यक्तीने उदारपणाने, नि:स्पृहतेने त्याच्या झालेल्या चुका प्रांजळपणाने मान्य केल्या असतील, त्याची कारणमीमांसा सांगितली असेल तर मग फारच उत्तम. आपल्या करिअरमध्ये त्या चुका टाळण्याचा प्रयत्न करून मग शॉर्टकटने यशोशिखरावर आरूढ व्हायची स्वप्नं ही मंडळी पाहूलागतात, ही जगरहाटीच आहे. अशा प्रकारची होतकरू मानस श्री. भवरलालजींना-भाऊंना-रोज भेटत असतात. ती भाऊंना उभे-आडवे-तिडवे प्रश्न विचारून हैराण करून सोडतात. भाऊ स्वत:च्या यशाचं गुपित लपवून ठेवत असावेत, असा त्यांचा समज असतो. अशा व्यक्तींना मन:पूर्वक मदत करावी व व्हावी, या हेतूने या पुस्तकाची आखणी-रचना करण्यात आली आहे.




वेगवेगळ्या वेळी-वेगवेगळ्या वर्षात-वेगवेगळ्या व्यक्तींनी भाऊंना भेटून त्यांच्या मुलाखती घेऊन किंवा त्यांच्या कार्याची माहिती गोळा करून लिहिलेले हे लेख आहेत. या संग्रहातील सर्व लेख त्या त्या वेळी कुठं ना कुठं तरी यापूर्वी प्रसिद्ध झालेले आहेत. म्हणूनच हा एक संग्रह आहे. लिहिणाऱ्या सर्वच व्यक्ती काही सिद्धहस्त लेखक आहेत, असे नव्हे, त्यातील काही पत्रकार आहेत. भाऊ या एकाच व्यक्तीकडं पाहण्याचा भिन्न-भिन्न प्रकृतीच्या लोकांचा दृष्टिकोनही भिन्न असू शकतो-आहे ही, हे वाचकांनी गृहीत धरायला हवे. अशा हाती असलेल्या गेल्या १० वर्षातील सुमारे ६० लेखांमधून हे लेख निवडले आहेत. या संग्रहातील लेख गेल्या दशकातील असल्याने सतत बदलणाऱ्या व्यवसायांचे जे संदर्भ प्रत्येक लेखात लेखकांनी दिले आहेत, त्यामध्ये नैसर्गिकरीत्याच फरक पडलाय व तो तसा पडणारच. तसेच प्रत्येक लेखकाचा विषय-भाऊंचे व्यक्तीमत्व व त्यांचे औद्योगिक यशापयश-हा सामाईकच असल्याने बऱ्याच ठिकाणी द्विरुक्ती झालेली आहे. परंतु प्रत्येक लेखामध्ये असणारा नैसर्गिक ओघ तुटू नये म्हणून मधूनच अशी द्विरूक्ती वगळण्याचा मोह मी टाळला आहे.

याच जोडीने वाचता वाचता हे ही लक्षात ठेवायला हवे, की सर्वच लेखक काही मराठी भाषक, मराठी भाषेचे खरे जाणकार नाहीत. भाऊंशी त्यांचा संपर्क झाला, ओळख वाढली म्हणून त्यांनी लेखणी हाती धरली इतकेच. या लेखांपैकी जेथे मला ढोबळ चुका आढळल्या (उदा. उलाढाल, वर्ष यांची आकडेवारी इ.) तेवढीच सुधारणा करण्याची मुभा मी घेतली आहे. त्यापलीकडे लेखकाची शैली, मथितार्थ इत्यादींमध्ये फरक केलेला नाही. तसेच लेखातील मजकुराला अनुरुप अशी काही छायाचित्रे व बहुतांश नामवंत साहित्यिक मंडळींनी त्यांच्या जैन उद्यागे भेटीप्रीत्यर्थ दिलेले लहान-मोठे अभिप्रायसुद्धा जोडण्याचे काम केले आहे. सदर लेखन व संकल्पनात व्यक्त केलेले विचार हे सर्वस्वी लेखकांचे/संकलकांचे आहेत. त्यांच्याशी मी किंवा भाऊ सहमत आहेतच किंवा नाही असे नाही,

भाऊ हे एक यशस्वी उद्योजक आहेतच. सुशिक्षितही आहेत; परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे ते एक सुसंस्कृत व्यक्तीमत्व आहे. भाऊ मुळचे मारवाडी खरेच. तथापि, गेल्या कित्येक पिढ्या इथल्या मातीत गेल्यामुळे आचार-विचारांनी भाऊ इतर कोणत्याही अस्सल महाराष्ट्रीयन माणसां इतकेच बावनकशी महाराष्ट्रीयनच आहेत. ज्यांचा ज्यांचा त्यांच्याशी प्रत्यक्ष संबंध आला, त्यांना हे नैसर्गिक सत्य पटायला हरकत नाही. 'भाऊ' या व्यक्तीकडे स्वत:ची अशी तात्त्विक बैठक आहे. जीवनाकडे, समाजाकडे पाहण्याचा एक विवक्षित दृष्टिकोन आहे. त्यांच्या स्वत:च्या वैयक्तीक नीतिमत्तेत जे बसत नाही, पटत नाही ते करणे त्यांना भावत नाही. पैसा, यश, प्रसिद्धी, व्यवसाय, पत या सर्वांच्या आधी त्यांच्याकडे नीतिमत्ता येत असते. तडजोड करणे अन् तीही विचारांशी, नीतिमत्तेशी हे त्यांच्याने होण्यातले नाही. भाऊंबद्दल लिहिलेल्या, बोललेल्या अनेकविध कलाकृतींपैकी निवडक लेखनाचे, कवितांचे, भाषणाचे संकलन आम्ही आणखी २-३ संग्रहांमध्ये सामावण्याचा प्रयत्न करणार आहोत. अशा या व्यक्तीमत्वाचा सुगंध वाचकांना लाभला तरी या पुस्तकाचे प्रयोजन साध्य झाले असे म्हणता येईल.

साभार-वाकोदचा वटवृक्ष